सहयोगी प्राध्यापक/ सहायक प्राध्यापक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या बदलीस स्थगिती देणेबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांकः न्यायाप्र-२०१९/प्र.क्र.(८१/१९)/ तांशि-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १९ ऑगस्ट, २०१९

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक : बदल्या-२०१८/ प्र.क्र.(१०३/२०१८)/ तांशि-१, दि. ३०.०५.२०१८

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रमांक : बदल्या-२०१८/ प्र.क्र.(१०८/२०१८)/ तांशि-१, दि. ३०.०५.२०१८

प्रस्तावना:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार संदर्भाधीन आदेशांन्वये सन २०१८ मध्ये राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील अध्यापकांच्या नियतकालिक बदल्या करण्यात आल्या होत्या. सदर बदली आदेशान्वये अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथून अन्यत्र बदली करण्यात आलेल्या काही अध्यापकांनी सदर बदली आदेशास मा. उच्च न्यायालय, मुंबई व तदनंतर विशेष अनुमती याचिका क्र.१३७५१-१३७५२/२०१९ व्दारे मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हानित केले होते. सदर न्यायालयीन प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०७.२०१९ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयास अनुलक्षून, संदर्भाधीन आदेशांन्वये अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथून अन्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांत बदली करण्यात आलेल्या व उक्त न्यायालयीन प्रकरणात याचिकाकर्ते असलेल्या अध्यापकांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने त्यांच्या बदली आदेशास स्थगिती देण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

संदर्भाधीन आदेशांन्वये अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथून अन्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांत बदली करण्यात आलेल्या व उक्त न्यायालयीन प्रकरणात याचिकाकर्ते असलेल्या अध्यापकांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने, खाली नमूद महिला अध्यापकांच्या स्तंभ-३ येथे करण्यात आलेल्या बदलीस, पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

अ.क्र.	अध्यापकाचे नाव, पदनाम व विद्याशाखा	बदलीने पदस्थापना करण्यात आलेली संस्था
१	२	३
१	श्रीमती एस. आर. कुरोडे, सहयोगी प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड
२	श्रीमती एस.एन. माढेकर, सहयोगी प्राध्यापक, उपयोजित यंत्रशास्त्र	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
३	श्रीमती ए. डी. ठुबे, सहयोगी प्राध्यापक, स्थापत्य अभियांत्रिकी	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
४	श्रीमती व्ही. एच. इनामदार, सहयोगी प्राध्यापक, संगणक अभियांत्रिकी	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

५	श्रीमती एन. आर. आनंद, सहायक प्राध्यापक, धातुशास्त्र	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी
६	श्रीमती एस. पी. कविश्वर, सहायक प्राध्यापक, गणित	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
७	श्रीमती एम. वाय. खळदकर, सहायक प्राध्यापक, रसायनशास्त्र	शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर

२. उपरोक्त ०७ अध्यापकांपैकी जे अध्यापक, संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्या दि.२५.०६.२०१९ च्या कार्यालयीन आदेशानुसार कार्यमुक्त होऊन स्तंभ-३ येथील त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रूजू झाले असतील, त्यांना संबंधित प्राचार्य/ संस्थाप्रमुखांनी दि.३१.०८.२०१९ पूर्वी कार्यमुक्त करावे व संबंधित अध्यापकांनी पुन:श्च अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे त्यांच्या मूळ पदावर दि. ३१.०८.२०१९ पर्यंत रूजू व्हावे.

३. सदर आदेश सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१९१७०९१६६४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2019.08.19 17:45:26 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. प्र. सह संचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
५. संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे- त्यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त सर्व अध्यापकांना अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे विनाविलंब रूजू करून घ्यावे व त्यांचा रूजू अहवाल संचालक, तंत्र शिक्षण यांचेमार्फत शासनास सादर करावा.
६. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अवसरी/ अमरावती/ कराड/ औरंगाबाद/ चंद्रपूर/ जळगाव
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२ मुंबई/ नागपूर.
८. संबंधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९. सर्व संबंधित अध्यापक
१०. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती/(तांशि-१)